# ADV .VITTHALRAO HANDE COLLEGE OF EDUCATION .

COURSE NO –102

UNIT NO ----1

NAME ------DR. VIDYA JADHAV .

# राज्य संस्था

- व्याख्या -----

१] " जीवनाच्या मुलभूत व प्राथमिक गरजामधून
राज्यसंस्थेचा उदय झाला आणि सुसंघटीत व विकसित जीवनाची प्राप्ती करून देण्यासाठीच
तिचे कार्य सातत्याने अध्यापही चालू आहे ."
ARISTOTLE
२] एखादा विशिष्ट भूप्रदेश व्यापलेला ,शासक व शासित या दोन प्रकारात विभाजित झालेला

व स्वतःला  सर्वश्रेष्ट वा  सर्वाधिकरी समजून अन्य संस्थावर आपली हुकुमत गाजविणारा

समाज म्हणजे राज्य .”

३] “ विशिष्ट भूप्रदेशावर कमी – अधिक सं ख्येत राहणारा ,कोणत्याही परकीय  सत्तेच्या  नियंत्रणपासून संपूर्णपणे किंवा बहुतांश  मुक्त

असणारा व ज्यातील सुसंघटीत शासनसंस्थेची

आज्ञा बहुसंख्य नागरिक स्वाभाविकपणे पाळतात .असा  समाज म्हणजे राज्य .

- राज्यसंस्था व शिक्षण

राज्यसंस्था कोणत्या प्रकारची आहे त्यावर शिक्षणाचे स्वरूप अवलंबून असते .

*राजेशाही मध्ये राजाची भूमिका , विचार ,तत्वज्ञान , आदर्श यावर शिक्षणाचे स्वरूप अवलंबून असायचे .

*उत्कृष्ट प्रशासक ,शिस्तबद्ध व आज्ञाधारक जनता ज्या शिक्षणातून निर्माण होईल .

- असेच शिक्षण दिले जायचे एकपक्षीय राज्यव्यवस्थामध्ये आदर्शवाद असतो .राज्यव्यवस्थात जो कोणता पक्ष आहे .त्या पक्षाच्या फायद्यानुसार शिक्षणव्यवस्था असते . लोकांना शिक्षेची भीती असते . राष्ट्रीय

हिताला प्राधान देणारी व लोकांना देशासाठी त्याग करण्याची वृत्ती निर्माण करणारी शिक्षणपध्दती असते .

प्राचीन काळी राज्याच्या कार्यामध्ये शिक्षणाचा अंतर्भाव नव्हता . गुरुकुलपद्धत्ती होती .शिष्यांनी दिलेल्या गुरु

दक्षिणेवर आश्रमाचा खर्च चालत असे .काही आश्रमांना

राजाश्रयही होता ,पण असे सर्व आश्रमाच्या बाबतीत नसे .

भारताने लोकशाही व लोककल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे . वैयक्तिक विकास व सामाजिक विकास यांच्या

समन्वयावर भर दिला आहे . समाजाच्या समस्या व गरजा विचारात घेऊन शिक्षणयोजना आखल्या आहेत .

# राज्यसंस्थेच्या शिक्षणविषयक कार्याचे दोन प्रकार पडतात .

१] आर्थिक कर्तव्य

अ] प्राथमिक शिक्षण निशुल्क करणे

ब] आथिक सवलती देणे .

क] शिष्यवृत्ती देणे.

ड] संशोधनासाठी अर्थसाहाय्य देणे .

२] शैक्षणिक कर्तव्य

अ] ध्येये ठरविणे

ब] शिक्षणाचे धोरण ठरविणे

क] मुल्यामापणाची सोय उपलब्ध करून देणे .

ड] पाठ्यपुस्तक तयार करणे

.

# शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन

(Education and Social Change)

# सामाजिक परिवर्तनाची संकल्पना-

## अर्थ, व्याख्या, घटक, प्रकार

(Concept of Social Change- Meaning, Definition, Factors, Types):

# भारतीय समाजावर प्रभाव टाकणाऱ्या शक्ती

(Forces working on Indian Society):

१) धार्मिक शक्ती
२) सामाजिक शक्ती
३) आर्थिक शक्ती
४) राजकीय शक्ती
५) भाषिक व प्रादेशिक शक्ती

# सामाजिक परिवर्तनाचा अर्थ:

- परिवर्तन म्हणजे बदल. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजामध्ये असणाऱ्या विविध घटकांमध्ये होणारा बदल. परिवर्तन हा जगाचा नियमच आहे. व्यक्ती, परिस्थिती, लोकजीवन हे सतत बदलत असते. निसर्गनियमाने त्यात बदल होतो. सामाजिक परिवर्तन हा सांस्कृतिक परिवर्तनाचा एक भाग आहे.

# व्याख्या :

- **१) डॉ. हॅरी जॉन्सन :** "समाजरचनेत घडून येणारा बदल हा सामाजिक परिवर्तनाचामूलभूत अर्थ होय."

- **२) गिन्स्बर्ग (Ginsberg):** समाजरचनेत म्हणजे समाजाच्या आकारात, विविध घटकांच्या रचनेत समन्वय किंवा व्यवस्थापन प्रकारात समन्वय अशी मी सामाजिक परिवर्तनाची संकल्पना असे समजतो.

- **३) जोन्स (Jones):** "सामाजिक कार्यपद्धती, सामाजिक व्यवस्था, सामाजिक आंतरक्रिया किंवा सामाजिक संघटना यांच्यातील कोणत्याही पैलूमध्ये होणारी सुधारणा किंवा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

- **४) किंग्जले डेव्हिस (Kingslay Davis):** "सामाजिक संघटनेतील म्हणजे समाजाची संरचना व कार्ये यातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

- **५) गिलिन आणि गिलिन:** "सामाजिक परिवर्तन हे जीवनात अंगिकारलेल्या पद्धतीत परिवर्तन करणे होय."

- **६) स्पेन्सर :** "जेव्हा जेव्हा रीतीभाती, चालीरिती, सवयी, अभिवृत्ती आणि उद्देश यामध्ये बदल घडून येतो तेव्हा त्यास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात."

# सामाजिक परिवर्तनाचे घटक/कारणे :

- १) भौतिक पर्यावरण
- २) जैविक परिस्थिती
- ३)यांत्रिक व तांत्रिक शोध
- ४) सांस्कृतिक घटक
- ५)आर्थिक घटक
- ६)वैचारिक घटक
- ७)कायदे

# सामजिक परिवर्तनाचे प्रकार:

- १) आंतरिक परिवर्तन
- २) बाह्य परिवर्तन
- ३) ऊर्ध्वगामी परिवर्तन
- ४) अधोगामी परिवर्तन
- ५) लाटसदृश्य परिवर्तन
- ६) सामाजिक मूल्यात परिवर्तन

# सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया

(Process of Social Change):

- १) पाशात्यीकरण (Westernisation)
- २) औद्योगिकरण (Industrialisation)
- ३) शहरीकरण (Urbanisation)
- ४) संस्कृतीकरण (Culturisation)
- ५) धर्मनिरपेक्षता (Secularisation)
- ६) राजकारणीकरण (Politicisation)
- ७) आधुनिकीकरण (Modernisation)
- ८) सामाजिक गतिमानता (Social Mobility)

# सामाजिक परिवर्तनातील अडथळे

(Obstacles in Social Change):

- १) नवीन गोष्टींचे भय
- २) रूढिप्रियता
- ३) आर्थिक विषमता
- ४) शासन
- ५) वय
- ६) स्वार्थ
- ७) नवीन विचार, शोध यांना लागणारा मोठा कालावधी

# सामाजिक परिवर्तनातील शिक्षणाची भूमिका व मर्यादा

:(Role and Limitations of Education in Social Change):

- ओटावे म्हणतात, "शिक्षण ही समाजातच चालणारी प्रक्रिया आहे. तिची ध्येये व तिच्या पद्धती या ज्या समाजात ती प्रक्रिया चालते त्या समाजाच्या स्वरूपावर अवलंबून असतात.“
- ब्राऊन यांच्यानुसार, "जेणेकरून व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवून आणून तद्वारा एकंदर समाजामध्येही बदल घडून येईल या हेतूने जाणीवपूर्वक नियंत्रित केलेली प्रक्रिया म्हणजे शिक्षण."

# शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन यांच्यातील संबंधाबाबत शिक्षणतज्ज्ञांची मते :

- **१) चिरंतन मूल्यवादी दृष्टिकोन:**

अमेरिकेतील शिक्षणतज्ञ रॉबर्ट हाचिन्स या दृष्टिकोनाचा पुरस्कर्ता आहे. त्यांच्या मते शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीमध्ये समाजसुधारणेचे प्रश्न समजून घेण्याची व त्यावर मत व्यक्त करण्याची परिपक्कता नसते. त्याच्यावर चिरंतन सांस्कृतिक मूल्यांचे संस्कार करावेत, त्याच्या बुद्धीला वळण लावावे व प्रचलित समाजव्यवस्थेशी समायोजन करायला त्याला शिकवावे आणि शिक्षणाची हीच कार्ये आहेत. हचिन्सच्या मते सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत विद्यार्थ्याला ओढू नये.

## 2) पुनर्रचनावादी विचार:

थिओडोर ब्रेमेल्ड या विचाराचा पुरस्कर्ता आहे. हचिन्सच्या विचाराच्या नेमके विरूद्ध विचार ब्रेमेल्ड याचे आहेत. त्याच्यामते सुधारणेचा सर्वस्पर्शी, सर्वंकष व योजनाबद्ध कार्यक्रम आखून तो विद्यार्थ्यांना शिकवावा व या माध्यमातून समाजाची पुनर्रचना, परिवर्तन करण्याची संपूर्ण जबाबदारी शिक्षणतज्ज्ञांवरच आहे.

## ३) प्रगमनशीलवादी विचार:

जॉन ड्युई या विचाराचा पुरस्कर्ता आहे. वरीलदोन्ही विचारांचा समन्वय ड्युई यांनी साधला आहे. त्यांच्या मते शिक्षणाद्वारे सुधारणेलाअनुरूप अशी मनोभूमिका तयार करावी. विद्यार्थ्यांना सुधारणेसंबंधी मर्मदृष्टी प्राप्त करून द्यावी. तसेच अभिवृत्तीच्या कृतीशील सवयीचा विकास करावा. अशा त-हेने संस्कारक्षम तरूण पिढी सामाजिक पुनर्रचना अत्यंत सक्षमतेने करू शकेल.. सामाजिक परिवर्तनात आधुनिकीकरण, औद्यागिकरण, सामाजिक गतिमानता, सुसंस्कार, सामाजिक बांधीलकी वैज्ञानिक दृष्टिकोन राष्ट्रप्रेम इ. गोष्टी अपेक्षित आहेत.

!!धन्यवाद!!